# हिंदू जनजागृति समिति

नोंदणी क्र. १५४०/आय-६३४, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

**संपर्क पत्ता :** ८, जय श्रीसिध्दीविनायक को.ऑप.हौ.सो., नौपाडा, ठाणे ४०० ६०२

दू.क्र. : (०८३२) २३१ ७७१२ **Email :** contact@hindujagruti.org **Website :** www.hindujagruti.org

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।। **दिनांक : १९.०९.२०१४**

प्रति,

मा. संपादक / मुख्य पत्रकार, **कृपया प्रसिद्धीसाठी !**

## ‘लव्ह जिहाद’ रोखण्यासाठी देशात कठोर कायदा लागू करा आणि मदरशातून होणारे धर्मांतर, विवाह यांवर बंदी घाला ! - श्री. प्रमोद मुतालिक

‘लव्ह जिहाद’च्या नावाखाली हिंदू, तसेच अन्य गैर-इस्लामिक मुलींना प्रेमात फसवून त्यांना इस्लाम धर्म स्वीकारायला लावणे या हेतूने धर्मांधांची एक मोठी टोळी देशभरात एका षड्यंत्राद्वारे कार्यरत आहे. ऑगस्ट महिन्यात राष्ट्रीय नेमबाज तारा सहदेव या हिंदु युवतीशी रकिबुल या धर्मांधाने हिंदु असल्याचे भासवून फसवून तिच्याशी विवाह केला आणि इस्लाममध्ये धर्मांतर करण्यासाठी तिच्यावर जबरदस्ती केल्याच्या प्रकरणाने याची दाहकता राष्ट्रीय स्तरावर समोर आली. ‘लव्ह जिहाद’ची समस्या संपूर्ण देशभरात वाढत असून, केरळ, महाराष्ट्र, कर्नाटक, देहली, आंध्र, उत्तर प्रदेश आदी राज्यांत अशा शेकडो घटना घडल्या आहेत आणि घडत आहे. लव्ह जिहाद हे देशविरोधी षड्यंत्र असल्याने ‘लव्ह जिहाद’ची पाळेमुळे खणून काढण्यासाठी स्वतंत्र कठोर कायदा करण्यात यावा आणि मदरशांतून केले जाणारे धर्मपरिवर्तन व विवाह अनधिकृत ठरवून त्यांवर बंदी घालावी, अशी मागणी श्रीराम सेनेचे संस्थापक-अध्यक्ष श्री. प्रमोदजी मुतालिक यांनी पत्रकार परिषदेत केली.

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेला हिंदु विधीज्ञ परिषदेचे सचिव अ‍ॅड्. संजीव पुनाळेकर आणि हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे उपस्थित होते. ‘शहान शाह व सिराजुद्दिन विरुद्ध केरळ शासन’ या न्यायालयीन खटल्याच्या प्रकरणातून लव्ह जिहादचा प्रकार देशासमोर सर्वप्रथम आला होता; मात्र आमच्या देशाच्या गृहमंत्र्यांना ‘लव्ह जिहाद काय आहे’ ते माहीत नसेल, तर ते अज्ञान दूर करण्यासाठी लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींना वा त्यांच्या नातेवाईकांना घेऊन गृहमंत्र्यांसमोर व लोकांसमोर सादर करण्यास आम्ही तयार आहोत.

**लव्ह जिहाद असल्याची महाराष्ट्र शासनाची कबुली ! -** केंद्रीय महिला आणि बाल विकासमंत्री मनेका गांधी यांनीही नुकतेच लव्ह जिहादची एकही अधिकृत तक्रार नसल्याचे वक्तव्य केले होते; मात्र काँग्रेस शासीत महाराष्ट्रात एक-दोन नव्हे, तर २२ लव्ह जिहादच्या तक्रारींची नोंद झाल्याची अधिकृत माहिती ‘माहिती अधिकाराच्या कायद्या’खाली महाराष्ट्र पोलीस महासंचालक यांनी दिलेली आहे. केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह आणि केंद्रीय मंत्री मनेका गांधी यांनी ही माहिती महाराष्ट्र शासनाकडून मागवावी व लव्ह जिहादच्या विरोधात कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे.

कम्युनिष्ट पक्षाचे केरळचे तत्कालीन मुख्यमंत्री अच्युतानंदन यांनी विदेशी पैशाच्या साहाय्याने भारतातील काही कट्टरतावादी संघटना ‘लव्ह जिहाद’ करत असल्याचे, तसेच केरळला इस्लामिक राज्य बनवण्याचे प्रयत्न करत असल्याचे विधान केले होते, तर सध्याचे केरळचे मुख्यमंत्री ओमेन चंडी यांनी २ सहस्त्र ५०० मुली इस्लाममध्ये धर्मांतरीत झाल्याची माहिती दिली आहे.

**या वेळी अन्य काही मागण्याही करण्यात आल्या...**

१. या नव्या विशेष कायद्यामध्ये अत्याचाराला बळी पडलेल्या हिंदु, जैन, शिख, बौद्ध आदी गैर-मुस्लिम धर्मातील मुलीच्या व तिच्या नातेवाईकांच्या जबानीवरून दोषी मुस्लिम समाजातील गुन्हेगाराला अत्यंत कठोर शिक्षा देण्याची तरतूद असावी. तसेच विवाहीत गैर-मुस्लिम मुलीला तिच्या मागणीनुसार तात्काळ घटस्फोट आणि मुलाच्या संपत्तीतील अर्धा वाटा मिळण्याची तरतूद असावी.

२. तसेच आंतरधर्मिय विवाहांसाठी विदेशातून होणारा अर्थपुरवठा, मुलींची तस्करी व त्यांचा आतंकवादी कारवायांसाठी वापर यांची केंद्रशासनाने उच्चस्तरीय चौकशी करून हा कट हाणून पाडण्यासाठी उपाययोजना करावी.

**More Information Pl Visit :**
http://www.hindujagruti.org/news/20774.html

रमेश शिंदे

श्री. रमेश शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ता,
(हिंदु जनजागृती समिती, संपर्क ९९८७९६६६६६)